**ह्या शरीराला म्हणतात क्षेत्र | त्या क्षेत्राला जो जाणतो | तो क्षेत्रज्ञ | १|१३|गीता.**

क्षेत्राला किंवा शेताला आकार असतो मर्यादा असतात तसेच शरीराचे असते. प्रश्न असा आहे की ह्या शेताला कोण जाणतो.? ह्या संबंधी ज्ञानेश्वर पुढे असा प्रश्न विचारतात की हे शेत सुपीक आहे. नापीक आहे की माळरान आहे? परंतु त्याच्या आधीच तेराव्या अध्यायाच्या दुसऱ्या श्लोकात श्रीकृष्ण असे जाहीर करतो की तो जो क्षेत्रज्ञ आहे तो मीच आहे. हे एका अर्थाने बरेच झाले. तत्वज्ञान्यांच्या भाषणाला कोणी जात नाही परंतु साध्या प्रवचनांना थोडी फार गर्दी लोटते कारण प्रवचनकार गोष्टी सांगत स्पष्टीकरण देतात आणि त्या गोष्टी असामान्य माणसांबद्दल किंवा देवदेवतांबद्दल असतात. ऐकणाऱ्यांच्या कानावर काहीतरी समजेल असे पडते आणि माना डोलतात कारण कोणतीतरी ह्या सगळ्या गोष्टींची जबाबदारी घेतो त्या गोष्टींना जाणतो आणि त्यांचा कारभारही चालवतो. हे विश्व त्याच्या स्वभावाने अचानक निर्माण झाले आहे असे सांगितले तर विश्वास कोण ठेवणार? नेहमीच्या जगण्यात प्रत्येक घटनेला घटनाकार असतो हा अनुभव ओलांडून घटनाकाराशिवाय घटना ही कल्पना पचायला जड जाते. ह्याच अध्यायाच्या तिसऱ्या श्लोकात मी तुला क्षेत्रक्षेत्रज्ञाचा व्यवहार किंवा रहस्य समजवून सांगतो असे श्रीकृष्ण म्हणतो आणि पुढच्या श्लोकात ह्या बाबतीत बऱ्याच लोकांनी प्रयत्न केले आहेत परंतु ते बहुतांशी निष्फळ ठरले आहेत असे श्रीकृष्ण म्हणतो. ह्या तिसऱ्या व चौथ्या श्लोकावर ज्ञानेश्वरांनी साठ ओव्या सांगितल्या आहेत. त्यात त्यांनी शरीरावर प्रदीर्घ टिप्पणी तर केली आहेच पण त्या ओव्यांच्या मध्यावर चेतना किंवा चैतन्यावर भाष्य केले आहे. त्यात जे नखौनी केशवरी | उभी जागे शरीरी | जे तिही अवस्था परी | पालटेना ||१३५|१३|ज्ञा. अशी ओवी आहे. पायाच्या नखापासून ते डोक्याच्या केसांपर्यंत आयुष्याच्या तिन्ही अवस्थेत ही खडखडीत जागी असते, आणि जी मन बुद्धीला टवटवी आणते आणि जी शरीररुपी वनाचा वंसत ऋतू आहे एवढेच नव्हे तर ज्या प्रमाणे लोहचुंबक लोखंडाच्या कणांना हलवतो किंवा चंद्रामुळे जशी सागराला भरती येते त्याप्रमाणे ही चेतनाच शरीराला हालचाल करायला लावते किंवा त्याच्यात प्राण फुंकते असे वर्णन इतर इथल्या ओव्यांमध्ये आले आहे. एका अर्थाने ही चेतनाच त्या शरीर नावाच्या क्षेत्राची क्षेत्रज्ञ आहे. असा निष्कर्ष निघू शकतो. ह्या विश्वाचा आधार उर्जा आहे हे पदार्थविज्ञान इथे परत अधोरेखित होते. इथे कोणा देवावर जबाबदारी टाकून मोकळे होऊ नये हेही लक्षात घेतलेले बरे. शरीर किंवा क्षेत्राबद्दल पुढच्या लेखात.

३३८ शब्द

पृथ्वी पाणी तेज | वायू आकाश | हीच पंचमहाभूते | हे जाण || ७७|१३|ज्ञा.

गीता श्रीकृष्णाने नंतर सांगितली असली तरी तिचा सांगाडा कपिल नावाच्या एका प्रगल्भ तत्वज्ञात्याने सादर केला आणि तो निरीश्वरवादी होता हे मी अडून का होईना म्हणतच राहणार आहे. ज्ञानेश्वरांनी सर्वात प्रदीर्घ आख्याने तेराव्या आणि अठराव्या अध्यायावर दिली आहेत त्या अध्यायांना ह्याच सांगाड्याचा आधार आहे. हे शरीर कशाचे बनले आहे, कसे हलते चालते विचार करते आणि शेवटी विखरून मातीमोल होते हे सांगतांना कपिलमुनींनी AQQar गप्पा मारलेल्या नाहीत तर त्या शरीराच्या प्रत्येक भागाला आणि करामतींना आकडेमोड करून क्रमांक दिले आहेत. वरच्या ओवीत ह्या शरीर नावाच्या क्षेत्राचे बांधकाम पृथ्वी पाणी तेज (अग्नी) वायू ह्यांच्या मदतीने आकाशात म्हणजे मोकळया जागेत होते असे विधान आहे. ही सगळी मंडळी ब्रह्म फुटल्यानंतरची. त्यातले आकाश पाहिल्या क्रमांकाचे. गीतेमध्ये जे वाऱ्याने सुकत नाही, पाण्यात विरघळत नाही. अग्नीने जळत नाही आणि शस्त्राने तुटत नाही ते ब्रह्म किंवा एकलत्व अशी विधाने आहेत. कारण ही पंचमाहाभूते नावाची मंडळी कानामागून येऊन तिखट होऊ शकलेली नाहीत असे गृहीतक आहे. परंतु ह्या पाचांमध्ये भाऊबंदकी आहे. ही गुण्यागोविंदाने राहू शकत नाहीत कारण त्यांचे स्वभाव अगदीच निराळे आहेत. पृथ्वीला पाणी विरघळवते , अग्नी पाण्याचे बाष्पीभवन करतो , वारा अग्नीला विझवतो आणि आकाश वाऱ्याला पोटात घेऊन त्याचे अस्तित्व संपवण्याचा प्रयत्न करते असे एक काव्यात्मक वर्णन उपलब्ध आहे. जीवसृष्टी जर जगायची तगायची असेल ह्या पाच मोकाटांना जी बांधून ठेवते. ती धृति अशी कल्पना कपिल मांडतो. त्या शब्दाचे मूळ धृ ह्या धातूत आहे. पाण्याला थांबवण्यासाठी धरण बांधतात ते धरून ठेवणे जे असते तिथेही हा धृ आहे. उतावळेपणा सोडून आपल्या उद्दिष्टांसाठी जो धीर धरला जातो तिथे आणि तारंबळ होऊ न देता जो किंवा जी खंबीरपणे संकटाचा सामना करतात. त्यांचातले जे धैर्य त्या धैर्य ह्या शब्दाचा उगमही धृ मधूनच आला आहे. खंबीर ह्या शब्दातला खांब सुद्धा ह्या धृतीने संपन्न आहे. म्हणून तो घराचे छप्पर तोलू शकतो. आकडेमोडीचे आश्वासन दिले होते म्हणून आता पंचमहाभूते पाच आणि धृति सहावी झाली.

३०४ शब्द